<u>विशेष दिवाणी दावा क्रमांक ४५/२०१३ मधील नि.क्र. १३७ वरील आदेश</u>
<u>(अरुणा पाटील वि. इंदुबाई पाटील मयत तर्फे वारस)</u>
<u>(**CNR No.MHSN**020003152013)</u>

वादी यांनी मुळ दावा वाटपासाठी, ठरावाकरीता आणि निरंतर मनाई मिळण्याकरीता दाखल केलेला आहे. परंतु प्रतिवादी नं. १ इंदुबाई शिवाजी पाटील यांचे निधन झालेले आहे. त्यांचे वारस म्हणजेच प्रतिवादी क्र. २ व ३ हे पुर्वीच रेकॉर्डवर असल्यामुळे प्रस्तूत प्रतिवादी नं. १ यांचे नाव कमी करण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

०२. सदरहु अर्जाला अनुषंगून प्रतिवादी यांनी त्यांचे म्हणणे दाखल केलेले आहे व त्यांनी अर्ज फेटाळण्याची मागणी केलेली आहे.

०३. निर्विवादपणे दाव्याचे स्वरुप पाहता दावा वाटप होऊन मिळण्याकरीता, ठरावाकरीता आणि निरंतर मनाई मिळण्याकरीताचा असल्यामुळे सर्व प्रतिवादींचे म्हणणे रेकॉर्ड वर येणे व त्यांना पुराव्याची संधी मिळणे आवश्यक आहे. त्यामुळे जर प्रतिवादी यांच्या वारसांना रेकॉर्ड वर घेतले नाही, तर त्यांच्या विरुध्द केस अबेट होउन सदरची केस आपोआप संपुष्टात येईल. याकामी प्रतिवादी क्र. १ चे वारस म्हणजेच प्रतिवादी क्रमांक २ व ३ हे पुर्वीच रेकॉर्डवर असल्यामुळे प्रतिवादी क्र. १ चे नाव कमी करणेचा अर्ज मंजूर करणे क्रमप्राप्त ठरते. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारीत करणेत येत आहे.

<u>आ दे श</u>

वादी यांचा नि. १३७ कडील अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

VIBHA PRAKASH GAIKWAD

Digitally signed by VIBHA PRAKASH GAIKWAD
Date: 2024.08.13 11:56:25 +0530

**ठिकाण –सांगली.** **(विभा प्र. गायकवाड)**
**दिनांक– ०८.०८.२०२४** **दुसरे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, सांगली.**